# प्रतिज्ञापत्र

मी कु.सुवर्णा सुखदेव गुंड प्रतिज्ञापूर्वक सांगते की, "कवी कुंजविहारी यांची कविता : एक अभ्यास" ('गीतगुंजारव', 'आहुती' या काव्यसंग्रहाच्या आधारे) या विषयावरील लघुप्रबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना एम्. फिल. (मराठी) या पदवी परीक्षेसाठी सादर करीत आहे.

हा लघुप्रबंध मी स्वतः लिहलेला असून तो पूर्णपणे स्वतंत्र आहे. यापूर्वी अन्य कोणत्याही परीक्षेसाठी मी तो सादर केलेला नाही.

अभ्यासक

सोलापूर

दि.२९/०७/२००५

कु.सुवर्णा सुखदेव गुंड

# प्रमाणपत्र

कु.सुवर्णा सुखदेव गुंड यांनी "कवी कुंजविहारी यांची कविता : एक अभ्यास"

या विषयावर माझ्या मार्गदर्शनाखाली समाधानकारक रीतीने लघु-प्रबंधाचे लेखन केले आहे. प्रस्तुत लेखनांतील विश्लेषण आणि विवेचन स्वतंत्र असून यातील कोणताही मजकूर अभ्यासकाने अन्यत्र उपयोजिला नाही.

प्रस्तुत विषय कविता या वाङ्.मय प्रकारातील आहे. हा लघुप्रबंध शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्याकडे एम्. फिल. (मराठी) या पदवी परीक्षेच्या परीक्षणासाठी अभ्यासकाने सादर करण्यास माझी अनुमती आहे.

सोलापूर

दिनांक - २९ / ०७ /२००५

मार्गदर्शक
(डॉ.कृष्णा जोतीराम इंगोले)
प्रपाठक, मराठी विभागप्रमुख
सांगोला महाविद्यालय, सांगोला

प्राचार्य
संगमेश्वर महाविद्यालय
सोलापूर

Dr. M. S. Deshmukh
Head, Department of Marathi
Sangameshwar College, Solapur.

# ऋणनिर्देश

मराठी साहित्यामध्ये 'कविता' हा विभाग मला लहानपणापासूनच आवडतो. या विभागानध्ये विशेषतः ज्या काव्यातून स्फुरण येईल चेतना मिळेल, जेणे करून ते राष्ट्रहितासाठी असेल असे आशावादी प्रेरणादायी काव्य आवडत असे. त्याचेच नाव 'राष्ट्रीय कविता' असे आहे. स्वराज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे केले गेले. याच कालावधीमध्ये कुंजविहारीचे जन्मशताब्दी वर्ष १९९७ साजरे करण्यात आले. मनात विचार आला सोलापूरच्या इतिहासामध्ये सांस्कृतिक साहित्यिक, सामाजिक, बाजूने भरीव काम करणारे कवी कुंजविहारी यांच्याच काव्याचे संशोधन का करू नये? आणि कुंजविहारीचे 'गीत गुंजारव' व 'आहुती' हे दोन काव्य संग्रह चा अभ्यास एम्.फिल (मराठी) पदवीसाठी मी निवडला. या साहित्याचा अभ्यास करावा असे वाटले आणि प्रेरणा व मार्गदर्शन माझे आदरणीय मार्गदर्शक डॉ.कृष्णा इंगोले यांची मान्यता मिळाल्याने अभ्यासासाठी तो विषय मी निवडला. हा विषय मान्य करण्यापाठीमागे शिवाजी विद्यापिठातील मराठी विभाग प्रमुख यांचाही वाटा आहे.

कवी कुंजविहारी यांनी 'गीत गुंजारव' काव्यसंग्रह प्रकाशित केला. तसेच शिवाजी विद्यापीठाने 'आहुती' हा काव्यसंग्रह प्रकाशित करून कवीच्या कार्याचा गौरव केला. कवीचे काव्य महाराष्ट्रतच गाजले असे नाही तर 'भेटेन नऊ महिन्यांनी' या कवितेसारख्या काव्याने पूर्ण भारतभर नावलौकिक मिळविला. कवीचे कार्य व कविता यांच्यात आधी करावे मग सांगावे असे नाते आहे. अशा थोर कवी व काव्याचा अभ्यास करावा असे मनात आले व त्यातून हा लघुप्रबंध साकार झाला.

या लघु प्रबंधाचा अभ्यास करताना माझे आदरणीय मार्गदर्शक डॉ.कृष्णा इंगोले यांचे मार्गदर्शन मिळाले. संगमेश्वर महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख डॉ.महादेव

देशमुख यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. त्याच बरोबर संगमेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य नरेश बदनोरे यांनी प्रेरणा व सहकार्य दिले व सुविधा उपलब्ध करून दिल्या या महाविद्यालयातील इतर सेवक वर्ग, विशेषतः उल्लेख करावा असा दिपाली करजगीकर मॅडम यांनी अतिशय मोलाचे सहाय्य केले. याच कॉलेजमधील ग्रंथालय सेवक श्री.कांबळे यांचेही मोलाचे सहकार्य मिळाले. त्याबद्दल मी कृतज्ञ आहे.

भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक, आदरणीय बळीराम (काका) साठे यांची प्रेरणा मिळाली तसेच माऊली महाविद्यालयाचे प्राचार्य शंकरराव पाटील यांचेही सहकार्य मिळाले. त्याबद्दल मी ऋणी आहे.

चरित्रात्मक पध्दतीने अभ्यास करत असता कवी विषयी माहिती मिळविणे मोठे कठीण काम होते ते शक्य केले ते कुंजविहारींच्या कन्या कु.वसुंधरा सलगरकर, कुंजविहारीचे भाचे कवी दत्ता हलसगीकर, कुंजविहारीचे स्नेही काकडे कुटुंबीय, अनिल काकडे, डॉ.नभा काकडे, कुंजविहारींचा मित्र परिवार कै.राम पुजारी, त्र्यं.वि.सरदेशमुख, किसन शिंदे, त्यांच्या काव्याचे अभ्यासक 'समग्र कुंजविहारी' या पुस्तकाचे संपादक डॉ.निलकंठ पुंडे यांच्या मुलाखतीने, या सर्वाची मी ऋणी आहे.

एक अर्वजून उल्लेख करावा लागेल तो म्हणजे हा अभ्यास करताना राष्ट्रीय कविता व तिचे स्वरूप संकल्पना मिळविणे कठीण होते परंतु अभ्यासाला दिशा मिळाली ती डॉ.जगन्नाथ नाईकवाडी यांच्या 'राष्ट्रवाद आणि आधुनिक मराठी कविता' या प्रकाशीत प्रबंधाने म्हणून त्यांच्या ही मला ऋणनिर्देश करावासा वाटतो.

माझ्या या अभ्यासात माझे यजमान श्री.धनंजय चव्हाण यांनी, योगीराज व दिग्विजय या दोन्ही बाळांच्या जबाबदारीचा भार उचलुन माझ्या अभ्यासाला प्रेरणा दिली. माझ्या आई - वडिलांनी अभ्यासाला प्रेरणा, प्रोत्साहन दिले. माझे मामा - मामी यांनी आशीर्वादाचा हात पाठीवरून फिरविला. माझे बंधू विजय गुंड व डॉ.संजय

गुंड यांचेही अभ्यासात मोलाचे सहाय्य मिळाले. अभ्यासाच्या कालावधीत अनेक नवीन सहकारी लाभले. प्रा.रिटे, प्रा.एस.टी. पाटील. श्री.मोहन भोसले, प्रा.जाधव मॅडम, प्रा.हाटकर, डॉ.प्रा.महेंद्र कदम या सर्वांनी मदत केली त्यांचीही मी आभारी आहे.

संगणकीय अक्षर जुळवणीचे काम श्री.प्रशांत देवराव व श्री.अभय पुराणिक यांनी अल्पावधीत व आकर्षक स्वरूपात करून दिले त्याबद्दल त्यांचेही आभार !

**कु.सुवर्णा सुखदेव गुंड**

लघु प्रबंधात वापरलेले संक्षेप

गीतगुंजारव : गीत

आहुती : आ.

लघु प्रबंधातील विवेचनात वरील संक्षेप वापरलेले आहेत.